॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रज्ञान संस्थेच्या वार्षीक सांस्कृतिक महोत्सव (ओपन हाऊस) मध्ये मी १९९७ व १९९८ मध्ये विद्यार्थी म्हणुन सहभागी झालो होतो. त्याच कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणुन येताना खुप आनंद होत आहे. अशी भावना खा. उन्मेश पाटील यांनी व्यक्त केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या यु.आय.सी.टी. विभागात दरवर्षी प्रमाणे विद्यार्थांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक सांस्कृतिक महोत्सव “ओपन हाऊस – २०२४” चे आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी जळगाव लोकसभेचे खा. श्री. उन्मेष पाटील उपस्थित होते, अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी होते.

विद्यार्थी असताना १९९७ व १९९८ साली ओपन हाऊस मध्ये सहभागी झालो होतो आज अतिथी आहे यादरम्यान चा प्रवास सांगताना खा.उन्मेष पाटील यांनी अनेक प्रसंग सांगितले व आनंद व्यक्त केला. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संचालक प्रा. डॉ. जे. बी. नाईक हे यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय विज्ञान दिवस निमित्त प्रा. डॉ. पी. माहुलीकर यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन कसा रुजवावा यासाठीचे अनेक दाखले देऊन उपस्थितांना प्रेरित केले. उद्घाटन प्रसंगी वृक्षारोपणाही करण्यात आले. या दरम्यान पोस्टर प्रेझेंटेशन, व्यक्तिमत्व विकास, गायन, नृत्य, नाटक, स्टँडअप कॉमेडी, विज्ञान प्रश्नमंजुषा, ट्रेझ्न हंट, ललित कला आणि छायाचित्र प्रदर्शन इत्यादी विविध सांस्कृतिक आणि व्यावसायिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दोनशे हून अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे.

समन्वयक प्रा. जी. ए. उस्मानी यांनी प्रास्ताविक केले प्रा. ए. के. गोस्वामी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २८ फेब्रुवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी